| MHOS090033172024 | दाखल दिनांक | :- | ०९/१२/२०२४ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :- | १२/१२/२०२४ | | |
| | निकाल दिनांक | :- | ०६/०७/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०१ | ०६ | २८ |

**भाग अ**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(i) अन्वये]**

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.३) कळंब, ता. कळंब,**

**जि. धाराशिव यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी - अमृता धोंडीराम जाधव)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक ०६/०७/२०२६

| | |
|---|---|
| नि. फौजदारी खटला क्र. १९३/२०२४ | निशाणी क्र. ३५ |
| गु.र.क्र.३०५/२०२४ | पोलीस स्टेशन- कळंब |
| फिर्यादी पक्ष | महाराष्ट्र शासनतर्फे<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन कळंब,<br>ता. कळंब, जि.धाराशिव. |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी विधिज्ञ | श्री. एस.टी. वैद्य |
| **विरुध्द** | |
| आरोपी | १. अविनाश अर्जुन कुटे<br>वय ३२ वर्षे,<br>२. भागीरथी उर्फ भाग्यश्री अर्जुन<br>कुटे, वय ६० वर्षे,<br>दोघे रा. बार्शी नाका, शिवनेरी |

| | |
|---|---|
| | कॉलनी, बीड, ता.बीड, जि.बीड. |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्रीमती. जे.बी. साळवे |

## भाग ब

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | दिनांक १२/१२/२०२१ ते दिनांक २५/०२/२०२४ रोजीपर्यंत |
| गुन्हा दाखल दिनांक | ०७/०८/२०२४ |
| दोषारोप दाखल दिनांक | ०९/१२/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २३/०४/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६/०७/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -- |

## आरोपींची सविस्तर माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अविनाश अर्जुन कुटे | १४/०८/२४ | १४/०८/२४ | भा.द.वि. चे कलम ४९८-अ, ३२३ आणि ५०४ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | --- | --- |
| २) | भागीरथी उर्फ भाग्यश्री अर्जुन कुटे | | | | | | |

## भाग क

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(iii) अन्वये]**

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | अंकिता अविनाश कुटे | फिर्यादी | २८ |
| २. | ज्योती हनुमंत जाधव | साक्षीदार | ३० |

### ब. आरोपींतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## फिर्यादी पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. फिर्यादी पक्षाचा पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | --- | --- |

### ब. आरोपींतर्फे पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | ---- |

## न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक ०६ जुलै, २०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यानंतर संक्षिप्तपणे भा.दं.वि. असे संबोधण्यात येत आहे) चे कलम ४९८-अ, ३२३ आणि ५०४, सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे कीः-**

**२.** अंकिता अविनाश कुटे (येथुन पुढे 'फिर्यादी' असे संबोधण्यात येईल) यांनी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन, कळंब येथे फिर्याद दिली की, दिनांक ३०/०६/२०२१ रोजी त्यांचा विवाह आरोपी क्र.१ सोबत अडीच लाख रुपये हुंडा व पाच तोळे सोने देवुन हिंदु रितीरिवाजाप्रमाणे माहेकर कॉलेज, डिकसळ येथे झाला होता. लग्नानंतर त्या सासरी बार्शी नाका, शिवनेरी कॉलणी, बीड, ता., जि.बीड येथे गेल्या. तेथे आरोपींनी तिला काही दिवस चांगले नांदविले. परंतु, त्यानंतर छोट्या छोट्या कारणांवरुन त्यांना त्यांची सासु आरोपी क्र.२ हिने मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच, आरोपी क्र.२ ही त्यांना घरातील कोणत्याच वस्तुला हात लावु देत नव्हती तसेच, फिर्यादीस आरोपी क्र.२ ही ''तुझ्या वडीलांनी आमचा लग्नात चांगला मानपान केला नाही, हुंडा दिला नाही म्हणुन तुला सुन म्हणुन घरात आणलेले नाही मोलकरीण म्हणुन ठेवुन घेणार आहोत'' असे म्हणत होती.

**३.** दिनांक १२/१२/२०२१ रोजी फिर्यादी घरात स्वयंपाक करत असताना

आरोपी क्र.२ त्यांना ''माझ्या मुलाला तुझ्यापेक्षा चांगली मुलगी बघुन तुला मोलकरीण म्हणुन घरात ठेवुन घेणार आहे'' असे कारण काढुन त्यांना घालुन पाडुन बोलुन शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी क्र.१ हा रात्री ड्युटीवरुन घरी आल्यानंतर फिर्यादीने त्यास सदरच्या घटनेबाबत सांगितले असता आरोपींनी मिळुन त्यांना हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली व त्यांना ''तुला नीट स्वयंपाक करता येत नाही, आम्ही तुला नांदविणार नाही, तुझ्या वडीलांकडुन २,००,०००/- रुपये घेवुन ये'' असे म्हणुन त्यांना डिकसळ येथे पाठवुन दिली. त्यानंतर दिनांक १३/१२/२०२१ रोजी त्या माहेरी डिकसळ येथे आल्या व त्यांच्या वडीलांना आरोपींनी दोन लाख रुपये मागितल्याचे सांगितले. त्यानंतर त्या माहेरी तीन महिने राहिल्यानंतर त्यांच्या वडीलांनी त्यांना त्यांच्या सासरी बीड यथे नेवुन सोडले व आरोपींना ''सद्या माझ्याकडे पैसे नाहीत मी पैसे आल्यानंतर देतो, माझ्या मुलीला चांगले नांदवा'' असे सांगितले.

४. त्यानंतर अरोपींना फिर्यादीस एक ते दिड वर्षे चांगले नांदविले. त्यानंतर आरोपी क्र.२ हिने त्यांना बारीक सारीक कारणावरुन शिवीगाळ करुन तसेच, उपाशी पोटी ठेवुन मानसिक व शारीरीक त्रास देण्यास सुरुवात केली. फिर्यादीने सदरची बाब वारंवार आरोपी क्र.१ यास सांगितली असता त्याने फिर्यादीस ''माझी आई चांगली आहे, तु तुझ्या वडीलांकडुन तुला सांगितलेले पैसे आणले नाहीस, माझी आई जे सांगेल ते तला ऐकावेच लागेल, माझी आई जसे म्हणेल तसे तुला रहावे लागेल आणि तुमच्या दोघींमध्ये काय घडले त्याबाबत मला शब्दही सांगायचा नाही मी तुझे काहीच ऐकुन घेणार नाही, आई जस म्हणेल तसे तु या घरात रहा नाहीतर तुझ्या मायबापाकडे निघुन जा'' असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीस बरेच दिवस असाच त्रास चालु राहीला. परंतु, त्याबाबत त्यांनी त्यांच्या माहेरी काहीही कळविले नाही.

५. फिर्यादीने आरोपी क्र.२ हिस माहेरी जाण्याकरीता विचारले असता तिने सांगितले की, ''माझा मुलगा कंत्राटी स्वरुपात काम करतो त्याला नोकरीवर कायम करण्याकरीता येताना बापाकडुन दोन लाख रुपये घेवुन ये'' असे म्हणुन आरोपींनी त्यांना शिवीगाळ आणि मारहाण करुन दिनांक २५/०२/२०२४ रोजी सकाळी ११.३०

वाजता घराबाहेर हाकलुन दिले. त्यानंतर त्या सासरी बीड येथुन माहेरी डिकसळ, ता.कळंब, येथे आई-वडीलांच्या घरी आल्या. त्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द वरील आशयाची फिर्याद दाखल केली.

६. सदर फिर्यादवरुन कळंब पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३०५/२०२४ भा.द.वि. चे कलम ४९८(अ), ३२३ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा नोंद झाला. सदर गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री. पी.डी. पुंडगे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान फिर्यादी अंकिता हिचा दिनांक ०८/०८/२०२४ रोजी पुरवणी जबाब नोंदवुन, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. तसेच, घटनास्थळ पंचनामा तयार करुन तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

७. दोषारोप-पत्र व त्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करुन व आरोपीची बाजू ऐकून निशाणी क्र.१२ अन्वये आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८(अ), ३२३ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी तो अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली.

८. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन साक्षीदारांना तपासण्यात आले. त्यानंतर दि.०९/०३/२०२६ रोजीच्या निशाणी क्र. ३१ वरील पुरसीसच्या अनुषंगाने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द दोषात्मक पुरावा न मिळून आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

९. मी अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस.टी. वैद्य व आरोपींतर्फे विधीज्ञ श्रीमती जे.बी. साळवे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचे कथन साक्षीदारांचे जबाब दाखल झालेले दस्तऐवज आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणेमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपींनी आपसात संगनमत करून दिनांक १२/१२/२०२१ ते दिनांक २५/०२/२०२४ रोजीपर्यंत फिर्यादीच्या सासरी राहते घरी मौजे बार्शी, नाका, शिवनेरी कॉलनी, बीड येथे फिर्यादीच्या वडीलांकडुन रक्कम रु. २,००,०००/- घेवुन ये असे म्हणुन सतत शारीरीक व मानसिक त्रास दिला काय ? | नाही. |
| २. | फिर्यादी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण केली काय ? | नाही. |
| ३. | फिर्यादी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून त्यांचा उद्देशपुर्वक अपमान केला ज्यामुळे त्यांचे हातून शांततेचा भंग व्हावा वा अन्य कोणताही अपराध घडावा? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

**१०.** फिर्यादीतर्फे प्रस्तुत प्रकरणाच्या सिध्दतेकामी दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. बचावपक्षातर्फे कोणताही पुरावा नोंदवण्यात आलेला नाही.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबतः-**

**११.** मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी ते चर्चेकरीता एकत्रीत घेत आहे. या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, फिर्यादी पक्षाने आरोपींविरुध्द भा. दं. वि. कलम ४९८-अ, ३२३ आणि

५०४, सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप लावलेला आहे. सदर दोषारोप वाजवी संशयापलिकडे जाउन सिध्द करण्याची जबाबादारी ही अभियोग पक्षाचीच आहे. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने पुढील गोष्टी प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

१. आरोपींनी आपसात संगनमत करून १२/१२/२०२१ ते दिनांक २५/०२/२०२४ रोजीपर्यंत फिर्यादीला तिच्या वडीलांकडून रक्कम रु.२,००,०००/- घेवून ये असे म्हणुन सतत शारिरीक व मानसिक त्रास देवून शिवीगाळ करून माहेरी पाठवून दिले

२. आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली.

३. आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांना शिवीगाळ करून त्यांचा उद्देशपूर्वक अपमान केला.

**१२.** दोन्ही बाजुचा युक्तीवाद, अभिलेखावरील कादगपत्रे व पुराव्याचे मी निरीक्षण केले. अभियोगपक्षातर्फे आरोपींवर लावण्यात आलेला दोषारोप सिध्द करण्यासाठी घटनेतील महत्वाचे साक्षीदार / पिडीत नामे अंकिता (स.सा.क्र.१, निशाणी २८) हिची साक्ष नोंदवण्यात आली. तिच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, आरोपी क्र.१ हा तिचा पती असुन आरोपी क्र.२ ही तिची सासु आहे. आरोपी क्र.१ सोबत तिचे दिनांक २०/०६/२०२० रोजी लग्न झाले होते. लग्नानंतर त्या बार्शी नाका, बीड येथे रहावयास गेल्या. आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ भांडणे होती. त्यांच्यात भांडण झाल्यामुळे त्या डिकसळ येथे आल्या. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन, कळंब येथे तक्रार दिली. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान फिर्यादवर त्यांची सही असल्याचे मान्य केले आहे. परंतु, मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे.

**१३.** सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य केलेले नसल्यामुळे न्यायालयाच्या परवानगीने अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. एकंदरीत सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या

कथनास कोणतेही समर्थन अथवा कबुली दिलेली नाही.

**१४.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार ज्योती हनुमंत जाधव यांना निशाणी ३० अन्वये तपाण्यात आले आहे की, त्यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, फिर्यादी ही त्यांची मुलगी आहे. आरोपी क्र.१ हा त्यांचा जावई आहे, तर आरोपी क्र.२ ही तिची वीहीनबाई आहे. त्यांच्या मुलीचे लग्न आरोपी क्र.१ सोबत पाच वर्षापुर्वी झाले. त्यांच्या मुलीला आरोपींकडुन कोणताही त्रास नव्हता. पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला नव्हता.

**१५.** सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य केलेले नसल्यामुळे न्यायालयाच्या परवानगीने अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. एकंदरीत सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कोणतेही समर्थन अथवा कबुली दिलेली नाही.

**१६.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी अंकिता आणि साक्षीदार ज्योती यांनी आरोपींनी फिर्यादीस तिच्या वडीलांकडुन रक्कम रुपये २,००,०००/- रुपये घेवुन ये म्हणुन तिचा मानसिक व शारीरीक छळ केल्याची घटना घडल्याची बाब नाकारलेली आहे. तसेच, आरोपींनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केल्याबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा निशाणी ३२ मान्य केला असला तरी, फिर्यादी अंकिता व साक्षीदार ज्योती यांनी घटना नाकारलेली आहे. त्यामुळे संशय निर्माण होत आहे. तसेच, फिर्यादी अंकिता व साक्षीदार ज्योती यांनी फिर्यादी व आरोपींचा वाद मिटला असून उभयंतामध्ये आपापसात तडजोड झाली असल्याचे कथन केले आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यात तडजोड झाली असून सदरकामी तडजोड करण्यास न्यायालयाने परवानगी दयावी असा अर्ज निशाणी क्र.२६ वर फिर्यादीने दिला होता. परंतू सदर गुन्हा हा असमजुतपात्र असल्यामुळे सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात आला. फिर्यादीने निशाणी क्र.३१ वर पुरावा देणे नसल्याबाबत पुरसिस दाखल केली आहे.

**१७.** अशा परिस्थितीत, भा.दं.वि. चे कलम ४९८-अ, ३२३ आणि ५०४, सह कलम ३४ चे अपराध सिध्दीसाठी आवश्यक असलेले घटक फिर्यादीपक्ष

संशयापलीकडे जाउन सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबतः-</u>**

**१८.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्ष प्राप्तीनुसार भा.दं.वि. कलम ४९८-अ, ३२३ आणि ५०४, सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपींविरुध्द सिध्द करण्यास फिर्यादी पक्ष पुर्णपणे अपयशी ठरला आहे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करीता माझ्या मते आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ अविनाश अर्जुन कुटे आणि २. भागीरथी उर्फ भाग्यश्री अर्जुन कुटे, यांची भारतीय दंड विधानचे कलम ४९८-अ, ३२३ आणि ५०४, सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांमधून फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके व जामीनकतबे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकामी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक जातमुचलके द्यावेत, जे अपील कालावधी संपुष्टात येईपर्यंत वैध राहतील. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

सही/-

**दिनांकः-** ०६/०७/२०२६
**ठिकाणः-** कळंब

**(अमृता धोंडीराम जाधव)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग (न्यायालय क्र.३)
कळंब.